# <u>प्रेस नोट</u>

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२४.०१.२०२२

**आलोसे १) श्री.अशोक दामु बिऱ्हाडे, वय–५७, व्यवसाय–नोंकरी, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धरणगांव रा.प्लॉट नं. ३०, राधाकृष्ण नगर,एल.आय.सी.कॉलनी जवळ, पिंपळे रोड,अमळनेर ता.अमळनेर जि.जळगांव जि.जळगांव २)श्री.तुळशिराम भगवान सैंदाणे, वय–३४,व्यवसाय–कंत्राटी कर्मचारी समाविशीत शिक्षण तज्ञ,गट साधन केंद्र,पंचायत समिती धरणगांव रा.बोरोळे नगर जवळ,पंडीत कॉलनी, मुकबधीर शाळेजवळ चोपडा,ता.चोपडा जि.जळगांव यांना २,०००/–रु.लाचेची मागणी करुन आरोपी क्रं.२ यांना सदर लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद क्रंमाक** | :– | धरणगांव पो.स्टे. गु.र.नं. २७ /२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | १)श्री.अशोक दामु बिऱ्हाडे, वय–५७, व्यवसाय–नोंकरी, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धरणगांव रा.प्लॉट नं.३०, राधाकृष्ण नगर,एल. आय.सी.कॉलनी जवळ, पिंपळे रोड,अमळनेर ता.रअमळनेर जि.जळगांव जि. जळगांव **(जिल्हा परिषद विभाग, वर्ग–२)**<br>२)श्री.तुळशिराम भगवान सैंदाणे, वय–३४,व्यवसाय–कंत्राटी कर्मचारी समाविशीत शिक्षण तज्ञ,गट साधन केंद्र,पंचायत समिती धरणगांव रा.बोरोळे नगर जवळ,पंडीत कॉलनी, मुकबधीर शाळेजवळ चोपडा,ता.चोपडा जि.जळगांव |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.३०/१२/२०२१<br>२,०००/–रु. लाचेची मागणी करुन स्वीकारले. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | २,०००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.२४/०१/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार यांचे धरणगांव येथे स्वत:चे मालकीची नोबल इंटरनॅशनल शाळा आहे. सदर शाळेत १ ली ते ७ वी.पर्यंत वर्ग चालतात. सन २०१६ पासुन ते आजपवोतो नमुद शाळा ही स्वयं अर्थ सहाय्यता या तत्तावर चालते. शासनाच्या RTE (Right to Education) योजने प्रमाणे २५% विद्यार्थी हे शाळेत भरावयाचे असतात. त्यासाठी शासन प्रत्येक विद्यार्थामागे ८,०००/–रुपये वार्षीक अनुदान मंजुर करते. वरप्रमाणे अनुदान मंजुर होण्यासाठीचा प्रस्ताव गट शिक्षणाधिकारी,धरणगांव यांच्या मार्फतीने जिल्हा परिषद,जळगांव येथे पाठविण्यासाठी त्यांचे कार्यालयात सादर केला होता. आलोसे क्रं.१ यांनी सदर प्रकरणामध्ये काही त्रुट्या असल्याचे सांगुन सदर त्रुट्यांची पुर्तता करुन त्याचा अनुकूल अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात यातील तक्रारदार यांचेकडे २,०००/–रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि.३०/१२/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष दि. ३०.१२.२०२१ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी क्रं.१ यांनी तक्रारदार यांचे RTE (Right to Education) योजने प्रमाणे शाळेचे वर नमुद अनुदान मंजुरीसाठीच्या प्रस्तावावर अनुकूल अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष २,०००/–रुपये लाचेची मागणी केली त्यानंतर दि. २४/०१/२०२२ रोजी सदर लाचेची रक्कम आलोसे क्रं.१ यांचे सांगणेवरुन आरोपी क्रं.२ यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रंमाक:–** १०६४

**दुरध्वनी क्रंमाक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटस्अॅप क्रंमाक:–** ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक • अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

24.1.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**